# नियमित दिवाणी दावा क्र.१०२/२०२३
# CNR NO.MHRT1400002032023
# निशाणी क्र.१०७ खालील आदेश
# दि.०२/०४/२०२४

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.९ व प्रतिवादी क्र.१० चे वारस अभिलेखावर घेणेकरीता झालेला विलंब माफ करणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादी यांनी अर्जामध्ये कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.९ दिलीप गुणाजी शिगवण हे दि.०८/०८/२०२३ रोजी तर प्रतिवादी क्र.१० संदिप गुणाजी शिगवण हे दि.०५/०७/२०२० रोजी मयत झालेले आहेत. त्यांचे वारस दाव्याचे कामी पक्षकारी करणेसाठी झालेला १३३७ दिवसांचा विलंब माफ करणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. परंतु मयतांची माहिती व इतर कागदपत्रे काढणेस विलंब झाल्याने प्रतिवादी यांचे वारसांना दाव्याचे कामी पक्षकर करणेस विलंब झालेला आहे. वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. प्रतिवादीचे पैशाचे स्वरुपात कधीही भरुन येणारे नुकसान होणारे आहे. तरी प्रस्तुतचा विलंब अर्ज माफ करुन वारसांना पक्षकार करुन योग्य ती दाव्यामध्ये दुरुस्ती करणेची विनंती केली आहे.

३. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे वकीलांनी म्हणणे दाखल केलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र.९ व १० चे वारसांना नोटीस देखील काढलेली आहे. प्रतिवादी क्र.९ व १० चे वारसांना नोटीशीची बजावणी होवून त्यानी याकामी म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादींचे कथनानुसार सदरचा अर्ज खोटा व खोडसाळ असून तो मान्य नाही.

त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

४. वास्तवीक पहाता मुदतीच्या कायद्यानुसार मयत वादी किंवा प्रतिवादी यांचे वारस ते मयत झालेपासून ९० दिवसांच्या कालावधीत अभिलेखावरती घेणे गजचेचे आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ क्र. ४ (५) अन्वये प्रतिवादीचे वारस मुदतीत अभिलेखावरती न आणलेस विलंब माफीसाठी मुदतीच्या कायद्याचे कलम ५ अन्वये अर्ज दाखल करता येतो.

५. वादी यांचे अर्जातील विलंबासाठीचे नमुद कारण हे योग्य व पुरेसे आहे की नाही हे पाहणे गरजेचे आहे. अर्जातील कथने व म्हणणेचा विचार करीता असे दिसून येते की, वादी करीता मुखत्यार हे मुंबई येथे राहतात. त्यामुळे प्रतिवादी हे मयत झालेबाबतची माहिती त्यांना नव्हती. प्रतिवादी यांना दावा वर्ग झाल्याची नोटीस काढल्यानंतर न्यायालयात दाखल झालेल्या बेलिफ रिपोर्ट वरुन प्रतिवादी क्र.९ व १० मयत झाल्याची माहिती वादी यांना झाली. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.९ व १० मयत झाल्याबाबतचा अहवाल दि.२१/१२/२०२३ रोजी अभिलेखावरती दाखल केला आहे. त्यामुळे वादी यांच्या कथनामध्ये तथ्य असल्याचे दिसून येते. विलंब माफ करणेस सबळ व योग्य स्पष्टीकरण वादीने दिलेले आहे.

६. वादीचे अर्जातील मागणी मंजूर केलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही, याउलट प्रस्तुत अर्ज मंजूर न केल्यास वादी यांचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे. उपरोक्त कारणांचा विचार करीता वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब खालील आदेश करीत आहे.

.... ३ .......

**<u>– आदेश –</u>**

१. वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.९ व १० चे वारस अभिलेखावरती घेणेकरीता झालेला विलंब माफ करणेत येतो.

**ठिकाण – मंडणगड.** **(श्री.एम.ए.शिंदे)**

**दि. ०२/०४/२०२४.** **दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मंडणगड**

| I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order. | | |
|---|---|---|
| Court Name | :- | Civil Judge, J.D. & J.M.F.C., Mandangad, Taluka Mandangad, District- Ratnagiri. |
| Name of Stenographer | :- | Shri. D. R. Joshi |
| Date of Decision | :- | 02/04/2024. |
| Signed by P.O. on | :- | 02/04/2024. |
| Uploaded on | :- | 04/04/2024. |

.... .......